सकाळ

# 'यशोदा टेक्निकल'ला विजेता पुरस्कार

## राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मान

**सातारा, ता. १४ :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते 'सायबर सुरक्षेकरिता सायबर शिक्षण' हा राष्ट्रीय स्तरावरील 'विजेता पुरस्कार' यशोदा टेक्निकल कॅम्पसला देण्यात आला. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा ॲवॉर्ड्स' या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे होते. या वेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, सायबरचे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्विक हिल टेक्नॉलॉजीसचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर, मुख्य



**सातारा :** सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना यशोदाचे विद्यार्थी.

कार्यकारी अधिकारी विशाल साळवी व विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट क्लब विजेता पुरस्कार यशोदा टेक्निकल कॅम्पस अभियांत्रिकी विद्याशाखा, राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रा. चव्हाण विकास, सर्वोत्कृष्ट क्लब अध्यक्ष उपविजेता पुरस्कार किरण सानप देण्यात आला. यशोदा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे, उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सगरे, प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, संचालक डॉ. विवेक रेदासानी, सहसंचालक प्रा. आर. डी. मोहिते, गणेश सुरवसे, संगणक विभागाचे विभागप्रमुख डॉ. सरिता बलशेटवार आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

### तीन राष्ट्रीय पुरस्कार

■ **दरम्यान, यशोदा टेक्निकल कॅम्पसला या कार्यक्रमादरम्यान तीन राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले. सर्वोत्कृष्ट क्लब विजेता पुरस्कार, सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, सर्वोत्कृष्ट क्लब अध्यक्ष उपविजेता पुरस्कार या पुरस्कारांचा समावेश आहे.**